
# सत्यशोधक अण्णा भाऊ साठे

## उपेक्षितांच्या अंतरंगाचा वेध



डॉ. वनमाला सोपानराव लोंढे
डॉ. संजय भीमराव तोंडारकर
डॉ. सचिन शेषेराव घुगे

# सत्यशोधक अण्णा भाऊ साठे
# उपेक्षितांच्या अंतरंगाचा वेध

डॉ. वनमाला सोपानराव लोंढे
डॉ. संजय भीमराव तोंडारकर
डॉ. सचिन शेषेराव घुगे

**Akshita Publishers and Distributors**
**Delhi-110053 (India)**

*Published by :*

**Akshita Publishers and Distributors**

**J-180/5-A, Ram Pratap Marg**
**Kartar Nagar, Delhi-110053**
**E-mail: abooks2019@gmail.com**
**Mobile: 9968053557**

सत्यशोधक अण्णा भाऊ साठे उपेक्षितांच्या अंतरंगाचा वेध

**First Edition—December–2022**

**ISBN: 978-93-91120-04-7**

**Copyright:** Author

*All rights reserved no part of this work may be reproduced, stored in a retrieval system, or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording or otherwise, without the prior written permission of the author.*

*This Book has been published in good faith that the material provided by author is original. Every effort is made to ensure accuracy of material but the publisher and printer will not be held responsible for any inadvertent errors.*

**PRINTED IN INDIA**

Published by Akshita Publishers and Distributors, Delhi-110053. Laser Type Setting at Shahabuddin Computers, Printed at Milan Enterprises, Delhi-110002.

# अनुक्रमणिका

*भूमिका* (v)

*प्रस्तावना* (ix)

1. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील पर्यावरण — एक अभ्यास 1
   —सहा. प्रा. नारायण हणमंतराव पांचाळ
2. अण्णा भाऊ साठे यांच्या चिंतनातील मार्क्सवाद 5
   —प्रा. डॉ. दयानंद माधवराव गुडेवार
3. अण्णा भाऊ साठे यांचे कथाविश्व 13
   —प्रा. डॉ. अनिता काशीनाथ सोनवणे
4. अण्णा भाऊ साठे: वंचितांचा हुंकार 18
   —प्रा. डॉ. वनमाला लोंढे
5. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील विद्रोही नायिका 24
   —प्रा. डॉ. वशिष्ठ गणपतराव बन
6. अण्णा भाऊंच्या विचारातील मार्क्सवाद—आंबेडकरवाद 28
   —डॉ. दगडू नरसिंगराव दामावले
7. अण्णा भाऊ साठे यांची कम्युनिष्ट विचारसरणी 33
   —डॉ. अनिल माधव रेड्डी
8. अण्णा भाऊ साठे : जनमाणसातील लेखक 38
   —प्रा. डॉ. कृष्णा सुदाम इंगळे
9. अक्कलेची गोष्ट या लोकनाट्यातील भांडवलशाही प्रवृत्ती 44
   —डॉ. लालबा चां. दुमटकर

10. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील क्रांतिकारी नायक 49
—प्रा. पुरुषोत्तम एस. निर्मळ

11. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील बंडखोर नायक 56
—प्रा. डॉ. रंदिल गजेंद्र साहेबराव

12. अण्णा भाऊ साठेः व्यक्ती आणि वाङ् मय 62
—डॉ. नामदेव बापुराव सोडगीर

13. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील स्त्री प्रतिमा 71
—प्रा. डॉ. दिलीप साहेबराव सावंत

14. उपेक्षितांचे जगणे चित्रित करणारा लेखक अण्णा भाऊ साठे 76
—डॉ. शिवराज पाटील

15. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबऱ्या : उपेक्षितांच्या वेदनेचा उद्गार 81
—डॉ. गोविंद काळे

16. 'जग बदल घालुनी घाव' मधील आंबेडकरी तत्त्वज्ञान 87
—डॉ. भुजंग पाटील

17. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील राजकीय संदर्भाचा शोध 93
—डॉ. रजनी अ. बोरोळे

18. फकिरा कादंबरीतील सामाजिक संघर्ष : एक चिंतन 100
—डॉ. एस. पी. घायाळ

19. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील 'व्यक्ति रेखा आणि त्यांचा जीवन संघर्ष' 106
—प्रा. संदिप कोरडे

20. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील संघर्षशील 'स्त्री' नायिका 111
—बेटकर वैशाली चनबस

21. अण्णा भाऊ साठे यांच्या 'माकडीचा माळ' व 'वैजयंता' कादंबरीतील भटक्याउ उपेक्षितांचे चित्रण 121
—डॉ. हणमंत दादाराव वागलगावे

22. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरवाद 126
—प्रा. डॉ. पद्माकर गोने

23 अण्णा भाऊंच्या कादंबऱ्यातील स्त्रीजीवनाचे चित्रण
(विशेषसंदर्भ : आवडी, चंदन, चिखलातीलकमळ, वैजयंता) 131
—बाळासाहेब निवृत्ती कराड एवं
प्रा. डॉ. बी.आर. दहिफळे

24. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजजीवन :
एक आकलन 136
—डॉ. मारोती द. कसाब

25. भाषाप्रभू साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे 140
—डॉ विठ्ठल जंबाले

26. रंजल्या गांजल्यांचा वारसदारः अण्णा भाऊ साठे 152
—डॉ सुशीलप्रकाश चिमोरे

27. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अण्णा भाऊ साठे
यांचे योगदान 158
—प्रा. डॉ. गणेश गोविंदराव माने

28. क्रांतिकारी कवि, लेखक, नाटककार और
समाजसुधारक — अन्ना भाऊ साठे 163
—डॉ. संग्राम सोपानराव गायकवाड

29. मानवमुक्तिचे पक्षधर : साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे 168
—प्रा. डॉ. रामकृष्ण बदने

30. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील व्यक्तिरेखा 174
—प्रा. बालाजी गायकवाड

31 अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील स्त्री चित्रण :
एक अभ्यास 185
—डॉ.वनमाला सोपानराव लोंढे एवं
सौ.सत्यभामा सोपानराव लोंढे

32. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अण्णा भाऊ साठे यांचे योगदान 190
—प्रा. गायकवाड मारोती गोविंदराव

33. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील भौगोलिक संदर्भ 197
—डॉ. नवनाथ नरसिंग पुरी

34. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील स्त्री प्रतिमा 203
—प्रा. डॉ. सुरेखा बनकर / बादाडे

35. आण्णा भाऊ साठे का साहित्य : एक अनुशीलन 209
—प्रा. डॉ. बळीराम राख

36. अण्णा भाऊ साठे यांची वगनाट्चे 213
—डॉ. वैशाली तातोबा चौगुले

37. माझी मैना गावावर राहिली ! 218
—डॉ. माधव बसवंते

38. अण्णा भाऊंच्या साहित्यातील स्त्री नायिका 226
—साखरे गंगाधर धोंडीबा

39. अण्णा भाऊ साठे यांचा साहित्यिक प्रवास 230
—डॉ. संगीता घुगे

40. संयुक्त महाराष्ट्र आणि अण्णा भाऊ साठे 237
—डॉ संजय भीमराव तोंडारकर

41. अण्णा भाऊ साठे यांचे विचार : एक दृष्टिक्षेप 243
—प्रा. डॉ. जितेंद्र पांडुरंगराव काळे'

42. अण्णा भाऊंच्या साहित्यातील फुले, शाहू, आंबेडकरी विचारधारा 248
—प्रा.डॉ. अनिल एस. कांबळे'

32

# संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अण्णा भाऊ साठे यांचे योगदान

–प्रा. गायकवाड मारोती गोविंदराव*


## गोषवारा

अण्णा भाऊ साठेंच्या साहित्याचा संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात मोठाप्रभाव दिसून येतो.त्यांच्या शाहिरी आणि वगाने सर्वसामान्यांमध्ये चेतना निर्माण केली होती. महाराष्ट्राच्या उभारणीत आणि जडणघडणीमध्ये ज्या ज्या घटकांनी योगदान दिलेआहे. त्याविषयीची आकर्षण त्याबद्दल मनामध्ये असलेली कुतूहल आणि जिज्ञासा निर्माणझाल्याने त्याबद्दल सविस्तर संशोधनात्मक मांडणी करण्याच्या उद्देशाने प्रस्तुत शोधनिबंधातसंयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात अण्णा भाऊंच्या साहित्याचा कोणत्या स्वरूपात परिणाम झालाआहे हे समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. अण्णा भाऊंनी विविध साहित्यप्रकार संयुक्तमहाराष्ट्राच्या चळवळीसाठी कसे वापरले.त्यांनी आपल्या असामान्य प्रतिभेचा वापर कसा केला.आपल्या साहित्यातून समाज मनाला कोणता विचार दिला आणि महत्त्वाचे म्हणजे त्यांच्यामुंबईची लावणी अर्थात मुंबई कुणाची? या काव्याचा संयुक्त महाराष्ट्र चळवळीवर कसासकारात्मक परिणाम झाला हे या शोधनिबंधातून स्पष्ट करण्यात आले आहेअण्णा भाऊ साठेयांच्या विविधअंगी साहित्याची असणारी जिज्ञासा, आकर्षण तसेच त्यांच्या असामान्य साहित्यप्रतिमेची त्यांच्या प्रासंगिक विचारांची गरज



* सहा. प्राध्यापक मराठी विभाग, शिवनेरी महाविद्यालय शिरूर आनंतपाळ जिल्हा लातूर.
E-Mail: marotig2680@gmail-com

आजही आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या लेखणीतूनआणि त्यांच्या वगनाट्यातून वैचारिक क्रांतीचा संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीवर परिणाम झालेलादिसतो.साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते परिवर्तनाचे,ज्ञानदानाचे माहितीचे,तसेचवैचारिक सर्जनशीलतेचे साधन असते हे अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यातून दाखवून दिलेआहे. साहित्याच्या माध्यमातून सामाजिक,वैचारिक, मानसिक जाणिवा कशा प्रगल्भ होत असतात हेत्यांनी आपल्या साहित्यातून दर्शविले आहे. अण्णा ाऊंनी आपल्या पोवाड्यातून शाहीरीतून आणिवगनाट्यातून मुंबईसह महाराष्ट्र झालाच पाहिजे हे जनमानसांवर बिंबवले आहे.मुंबईसहमहाराष्ट्राची निर्मिती झाली पाहिजे यासाठी अण्णा भाऊ साठेंचे साहित्य महत्त्वाचे ठरले आहे.

## प्रस्तावना

1 मे 1960 रोजी ज्या महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली त्यामध्ये अनेकांचेयोगदान महत्त्वाचे आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत अनेक समाजसुधारकांचे योगदान महत्त्वाचेआहे. 18 व्या आणि 19 व्या शतकात वेगवेगळ्या चळवळी झाल्या. त्यापैकी संयुक्त महाराष्ट्राचीचळवळ महत्त्वाचे आहे.19 वे शतक हे संक्रमण अवस्थेचे म्हणून ओळखले जाते.कारण या काळातअनेक प्रकारचे सामाजिक,आर्थिक, धार्मिक, राजकीय,शैक्षणिक, तंत्रज्ञानात्मक बदल झालेले दिसूनयेतात. सामाजिक भान आणि अन्यायाच्या विरोधात बंड करण्याची जाणीव या काळातसमाजमनामध्ये येत होती. याच काळात संताची वाणी, लेखकांची लेखणी, कलावंताची लावणी,मान्यवरांची भाषणे याद्वारे समाजात परिवर्तनाची दिशा प्रफुल्लित होत होती.

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. येथे अनेक धर्म,जाती, वंश, भाषा, संस्कृतीइत्यादीमध्ये विविधता आहे. अनेक भाषा,धर्म, संस्कृती असूनही भारत एकसंघ आहे. त्याचे कारणम्हणजे भारताची मानवतावादी संस्कृती होय. भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर अनेक भाषिक राज्यनिर्माण झाली परंतु एकसंघ महाराष्ट्र होऊ शकला नाही. अशावेळी महाराष्ट्रातील विचारवंत,अभ्यासक एकत्र आले आणि त्यातून संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा विचार पुढे आला. प्रस्तुतशोध निबंधात संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या योगदानाचा आढावा घेतला आहे. अण्णा भाऊ साठे हे एक साहित्यिक म्हणून परिचित आहेत परंतु,त्यांचे संयुक्त महाराष्ट्राच्याचळवळीमधील योगदान महत्त्वाचे असूनही ते दुर्लक्षित राहिले आहे. त्यांचे हे अदितीय कार्यप्रकाशात यावे.त्याबद्दल माहिती व्हावी.हा या शोधनिबंधाचा प्रमुख उद्देश आहे. अण्णा भाऊ साठेहे एक सिद्धहस्त लेखक म्हणून परिचित आहेत तसेच ते एक लोकशाहीर म्हणूनही प्रसिद्धआहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात ते साहित्याच्या माध्यमातून अग्रणी होते.परंतु यासंबंधीफारसे लिखाण,संशोधन झालेले

दिसून येत नाही. त्यांच्या या अविस्मरणीय कार्याची दखल नघेणे आणि वास्तविकता बाजूला ठेवणे ही एक वैचारिक समस्या संशोधकाला जाणवल्याने प्रस्तुतशोधनिबंधात त्यांच्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या अनुषंगाने मुंबई कोणाची यावगनाट्यामुळे व त्यातील 'माझी मैना गावावर राहिली माझ्या जीवाची होतीया काहीली' याशाहिरीमुळे तसेच इतर काव्य,पोवाडे इत्यादीमुळे अण्णा भाऊंचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्येअसलेले योगदान कसे महत्त्वाचे आहे,याविषयीची मांडणी केली आहे. त्यांच्या विविधअंगीसाहित्याचा केवळ साहित्य या अर्थाने विचार करून चालत नाही तर त्यांच्या साहित्याचा राजकीयदृष्टीने आशय समजून घेणे आवश्यक ठरते. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधात त्यांच्या साहित्याचासंयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत राजकीय दृष्टीने झालेला परिणाम अधोरेखित केला आहे.विविधचळवळी राजकीय जीवनाशी अनेक अर्थाने संबंधित असतात.या चळवळी राजकारणाला विशिष्टआयाम प्रदान करून देत असतात. या आशयाने अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा संयुक्तमहाराष्ट्र चळवळीवर झालेला परिणाम व एकंदरीत त्यांचे यातील योगदान प्रस्तुत शोधनिबंधातस्पष्ट करण्यात आले आहे.

## शोधनिबंधाचा उद्देश

1. अण्णा भाऊ साठेंच्या साहित्याचा संयुक्त महाराष्ट्र चळवळीवरील परिणाम अभ्यासणे.
2. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अण्णाभाऊ साठे यांच्या लावणी,वगनाट्य व शाहिरी आणि

पोवाड्यांची प्रासंगिक स्वरूपात चिकित्सा करणे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. याशोधनिबंधासाठी उपलब्ध असलेल्या दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. प्रस्तुतशोधनिबंधासाठी वर्णनात्मक आराखड्याचा उपयोग केला आहे.

## अण्णा भाऊ साठेंचे साहित्य आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ

अण्णा भाऊ साठेंचा स्वभाव बंडखोर,अन्यायाच्या विरोधात आवाज उठवणाराअसल्याने त्यांनी समाजातील व्यंगावर, विषमतेवर आपल्या लेखणीतून प्रहार केला आहे.संयुक्तमहाराष्ट्राच्या चळवळीत समाजाच्या सर्व स्तरातील लोकांनी आपापल्या परीने योगदान दिलेआहे.चळवळीची तीव्रता वाढवण्याची ताकद अण्णा

भाऊंच्या साहित्यामध्ये होती. संयुक्तमहाराष्ट्रात चळवळीमध्ये अण्णा भाऊ साठे, क्रांतिसिंह नाना पाटील,कर्मवीर दादासाहेब गायकवाडयांची कार्य महत्त्वाचे राहिले आहे. परंतु आजही अनेक अभ्यासक, इतिहासकार,साहित्यिकजाणीवपूर्वक त्यांच्या कार्याकडे दुर्लक्ष करतात. अण्णा भाऊ साठे हे सिद्धहस्त लेखक होते.त्यांनीआपल्या लेखणीतून समाज जागृती करून सर्वसामान्यांमध्ये स्वाभिमान जागा केला. त्यांनीआपल्या वाणीतून शाहिरीच्या माध्यमातून संपूर्ण समाज ढवळून काढला. खेड्यापाड्यात त्यांनीआपल्या वैचारिक आणि व्यंगात्मक लिखाणातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीसाठी पोषक वातावरणतयार केले. अण्णाभाऊ साठे या जगप्रसिद्ध लेखकाबाबत अनेकांनी आपली मते व्यक्त केलीआहेत. त्यांच्याबद्दल सर्व स्तरातील लेखकांना समीक्षकांना विचारवंतांना संशोधकांना आदर वाटतहोता. नारायण सुर्वे अण्णा भाऊ साठे यांना प्रकाशाचा दीपस्तंभ म्हणत असत. आचार्य अत्रेत्यांच्या साहित्याबाबत म्हणतात की, 'अण्णा भाऊंनी जगण्यासाठी लढणाऱ्या माणसाच्या कथालिहिल्या आहेत.' अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनात नेहमीच समाजाच्या वास्तव्य स्थितीचे दर्शनहोते. सर्वसामान्य कष्टकरी,शोषित, माणूस हा त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू होता.श्रमावर त्यांचेनितांत श्रद्धा होती म्हणूनच ते म्हणतात की, "माझी जीवनावर अत्यंत निष्ठा असून मला माणसं फार आवडतात त्यांची श्रमशक्ती महान आहे.श्रमिकांच्या श्रमावरच हे जग चालते,त्यांची झुंज वत्यांचे यश यावरच माझा प्रचंड विश्वास आहे म्हणूनच त्यांना विद्रप करणे मला आवडतनाही.नव्हे मला ती भीतीच वाटते.ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून दलितांनी कष्टकऱ्यांनी ती आपल्या हातावर पेलली आहे असे मी मानतो अशा या माणसांना वैफल्याच्यानावाखाली विद्रूप करू नये असे माझे मत आहे.वैफल्य हे तलवारीच्या धुळीसारखं असतं तिचीधूळ झटकून तलवार लखलखीत करता येते मी जे जीवन जगतो,पाहतो,अनुभवतो,ते मी लिहितो."

बाबा आढाव अण्णाभाऊ साठे विषयी म्हणतात की, अण्णा भाऊंचे साहित्य म्हणजे कष्टकऱ्यांचाबुलंद आवाज होय.ते पुढे म्हणतात की, अण्णा भाऊ साठे यांना लोकक्रांती, जनक्रांती,अभिप्रेतहोती बाबा आढाव यांच्या मते,संयुक्त महाराष्ट्राच्या जनआंदोलनाचा सर्वसामान्य जनतेपर्यंतआपल्या शाहीर विचार पोहोचवला तो म्हणजे अण्णा भाऊ साठे यांनीच होय.अण्णाभाऊ साठेसंयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्ये अग्रभागी होते. त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या संदर्भात लिहिलेल्यापोवाड्याने कार्यक्रमाची सुरुवात होत असे. म्हणूनच त्यांच्या लावणीतून,वगनाट्यातून शाहिरीतून,संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला एका अर्थाने पोषक असे खतपाणी मिळाले आहे हे कोणीचनाकारू शकत नाही. मुंबई या मायाजाल शहराचे वर्णन अण्णाभाऊंनी 'मुंबईची लावणी' अर्थात 'मुंबईकोणाची?' या लावणी मध्ये अत्यंत चपखल शब्दात केले आहे ते लिहितात,

*'मुंबईत उंचावरी!मलबार हिल इंद्रपुरी!*
*कुबेरांची वस्ती तेथे सुखभोगती!*
*परळात राहणारे रात्रंदिवस राबणारे!*
*मिळेल ते खाऊ नये घाम गाळती.'*

मुंबईतील पराकोटीची वर्गीय विषमता या लावणी मध्ये त्यांनी ठळकपणे रेखाटले आहेत.अण्णाभाऊ फक्त समाजाचे वर्णन करून थांबत नाहीत ते समाज बदलण्याची भाषा करतात. म्हणूनचमुंबई कुणाची?या लावणी मध्ये शेवटी ते लिहितात की,

*'लाल झेंडा घेऊनी हाती चला करा येथेक्रांती*
*मजुरांची नवी पिढी पुढे पाऊल टाकते.*
*अण्णा भाऊ साठे म्हणे बदलुनी हे दुबळे जिने*
*होणारजे विजयी ते रण करीती.'*

सन 1955 साली कर्नाटकातील बेळगाव येथे संयुक्त महाराष्ट्र समितीचेसाहित्य संमेलन भरले होते. त्यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी या संमेलनाची सुरुवातआपल्याशाहिरीच्या माध्यमातून केली होती. सर्व मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे भाषावारप्रांतरचनेच्या तत्वावर आधारित एकच राज्य स्थापन करण्यासाठी सुरू करण्यात आलेलेचळवळीला संयुक्त महाराष्ट्राची चळवळ असे म्हणतात.भाषावर प्रांतरचनेचा मुद्दा ज्यांनी ज्यांनीउचलून धरला होता त्यामध्ये अण्णाभाऊ साठे हे अग्रणी होते संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातकामगार शेतकरी विचारवंत सामाजिक कार्यकर्ते आणि सर्वसामान्य जनता ही प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणेसहभागी होती प्रत्येक जण आपापल्या पद्धतीने या आंदोलनामध्ये योगदान देत होते त्यामध्येअण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांनी आपल्यालेखणीच्या माध्यमातून वैचारिक पद्धतीने मुंबई सहसंयुक्त महाराष्ट्र मराठी भाषेसाठी कसायोग्य आहे यासंबंधीचे विश्लेषण पोवाडा लावणी शाहिरी व वगनाट्य इत्यादीच्या माध्यमातून केलेआहे.या अर्थाने अण्णाभाऊ साठेंनी आपल्या साहित्यातून संयुक्त महाराष्ट्राच्या लढायला प्रज्वलितकेले होते. जनमानसात संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाची जाणीव करून देत होते त्यांनी आपल्यासाहित्याच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला होता विविध प्रांतात विभागलेल्या मराठीभाषेत लोकांना एकत्रित करून त्यांनी एका प्रांतामध्ये सामील करून मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्रराज्य निर्माण करणे ही अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची भूमिका होती आणि त्यामुळेचअण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील योगदान अविस्मरणीयहोते हे कोणीही नाकारू शकत. नाही.

## सारांश / समारोप

अण्णा भाऊ साठेंच्या साहित्याचा केंद्रबिंदू हा सर्वहारा, शोषित, पीडित,वंचित असा समूह होता.अण्णा भाऊ या समूहाचे केवळ भावविश्व रंगवतात असे नव्हे, तर त्यांच्या जीवन जगण्याचासंघर्ष ते शब्दबद्ध करतात. त्याच अनुषंगाने सामाजिक वास्तविकता हे त्यांच्या साहित्याचेमूलभूत अंग आहे. त्यांचे समग्र लेखन सत्य घटनेवर आधारित असल्याने त्याला वास्तविकतेतीलवास्तविकतेचे झालं प्राप्त झाली आहे अशा प्रकारे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत ज्या अनेकलोकांनी महत्त्वाचे जबाबदारी पार पाडली.त्यामध्ये अण्णा भाऊ साठे यांचे स्थान अग्रभागीहोते.त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीला महत्त्वाचे योगदानदिले आहे. त्यांच्या मुंबईची लावणी अर्थात मुंबई कुणाची? या लावणीमुळे या आशयालाआव्हानित केले आहे त्याबरोबरच त्यांच्या वगनाट्यातून देखील संयुक्त महाराष्ट्र चळवळीस पोषकवातावरण तयार झाले होते एकंदरीत संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अण्णा भाऊ साठेंचे योगदानआतुलनीय असेच आहे.परंतु आजपर्यंत त्यांच्या या उत्तुंग कार्याची फारशी कोणी दखल घेतलीनाही म्हणून संशोधकाने प्रस्तुत शोधनिबंधात अण्णा भाऊ साठेंचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतीलयोगदान स्पष्ट केले आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा अशी अनेक धुरीनांची इच्छा होतीत्यामध्ये महर्षी अण्णासाहेब कर्वे यांचाहीसमावेश होता कर्वे यांनी 101 व्या वर्षात पदार्पण केलेतेव्हा पंतप्रधान नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 18 एप्रिल 1958 रोजी मुंबईत त्यांचा भव्यसत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी कर्वे म्हणाले होते,जीवनातील माझ्या सर्व आकांक्षा पूर्ण झाल्या आहेत आता नजीकच्या भविष्यकाळात महाराष्ट्र व गुजरात ही दोन राज्ये अस्तित्वात आलेलीयाची देही याची डोळा दिसली म्हणजे माझी कोणतीच इच्छा पुरणार नाही. महाराष्ट्र याभूप्रदेशाबद्दल अनेक मतमतांतरे आहेत. सर्वसाधारणपणे मराठी भाषिकांचे राज्य ते महाराष्ट्रअशी ओळख पूर्वीपासून आहे ती यापुढेही राहावी महाराष्ट्राच्या संदर्भात न्यायमूर्ती रानडे मराठीराज्याला मराठा राष्ट्र अशी संज्ञा वापरतात. मराठा सत्तेचा उदय या ग्रंथामध्ये ते लिहितातकी,ज्याला राष्ट्र म्हणतात त्याच्या निर्मितीची प्रक्रिया प्रथम सुरू झाली आणि तिच्यातूनच मराठीसत्तेचा उदय झाला. अण्णा भाऊ साठे यांच्या मते, जो लेखक कलावंत स्वतःवर,देशावर, आपल्यामातेवर, प्रेम करत असतो तो जनतेचेही कदर करतो आणि त्याचीच कदर जनता करत असतेअण्णाभाऊ साठेंचा देशावर जनतेवर आणि त्यांच्या संघर्षावर आढळ विश्वास होता देश सुखीव्हावा, समृद्ध व्हावा, आणि सभ्य व्हावा, इथे समानता नांदावी,महाराष्ट्र भूमीचे नंदनवनव्हावे, असे त्यांना रोज स्वप्ने पडत असत. अण्णा भाऊ साठेंचे आपल्या माय भूमीवर प्रचंड प्रेमहोते. आपल्या माणसाबद्दल त्यांना


सहानुभूती होती.म्हणूनच त्यांचे बहुतेक लिखाणसहानुभूतीतून येते. अण्णा भाऊ म्हणतात, कल्पनेलाही जीवनाचे पंख असणे आवश्यक असतेअनुभूतीला सहानुभूतीची जोड नसेल तर आपण का लिहितो याचा पत्ताच लागत नाही.म्हणून मीअशा माणसाबद्दल लिहितो ज्याबद्दल मला सहानुभूती वाटते. याचा अर्थाने अण्णाभाऊ साठेंनीसंयुक्त महाराष्ट्राचा संदर्भात विविध अंगी लेखन केलेले दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ


1. पेंडसे लालजी (2010) महाराष्ट्राचे महामंथन लोक वाङ्मय गृह मुंबई.
2. पोतदार माधव (2004) शाहीर अमर–अण्णा,अनुबंध प्रकाशन,पुणे
3. अण्णा भाऊ साठे इनामदार आणि इतर लोकनाट्य, श्रमिक प्रतिष्ठान,कोल्हापूर
4. कराडे सदा, अण्णा भाऊंचे कथाविश्व
5. युगांतर
6. सुर्वे नारायण, अण्णा भाऊंच्या कादंबऱ्या
7. अण्णा भाऊ साठे, विशेषांक, लोकराज्य, 1 नोव्हेंबर 1993
8. भोसले एस. एस., अण्णा भाऊंचे वगनाट्य स्वरूप व संदर्भ
9. जनवादी साहित्यिक, अण्णा भाऊ साठे, डॉ.पी.विठ्ठल, डॉ. राजेश्वर दुडकनाळे



**प्रा. डॉ. वनमाला सोपानराव लोंढे** (एम. ए. एम.फिल. पीएच.डी.) या उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोनसी ता. जळकोट जि. लातूर येथे सहाय्यक प्राध्यापक पदावर कार्यरत असून त्या मराठी विभागाच्या विभागप्रमुख आहेत. त्या नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संशोधन मार्गदर्शक आहेत. त्यांना 24 वर्ष अध्यापनाचा अनुभव असून त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सहभाग नोंदवलेला आहे. तसेच त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये अनेक शोधनिबंध प्रकाशित आहेत. त्यांचा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये सक्रिय सहभाग असतो.



**प्रा. डॉ. संजय भीमराव तोंडारकर** (एम ए. पीएच.डी.) हे उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोनसी ता. जळकोट जि. लातूर येथे सहाय्यक प्राध्यापक पदावर कार्यरत असून ते इतिहास विभागाचे विभागप्रमुख आहेत. त्यांना 23 वर्ष अध्यापनाचा अनुभव आहे. त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सहभाग नोंदवलेला असून त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये अनेक शोधनिबंध प्रकाशित आहेत.



**प्रा. डॉ. सचिन शेषेराव घुगे** (एम ए. बी.एड. नेट पीएच.डी.) हे उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोनसी ता. जळकोट जि. लातूर येथे सहाय्यक प्राध्यापक पदावर कार्यरत असून ते इंग्रजी विभागाचे विभागप्रमुख आहेत. त्यांना 09 वर्ष अध्यापनाचा अनुभव आहे. त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सहभाग नोंदवलेला असून त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये अनेक शोधनिबंध प्रकाशित आहेत.

₹895/-

ISBN 978-93-91120-04-7

**AKSHITA PUBLISHERS AND DISTRIBUTORS**
J-180/5-A, Ram Pratap Marg
Kartar Nagar, Delhi-110053
E-mail: abooks2019@gmail.com
Mobile: 9968053557

APD